गुरुवार दि.२४ ऑक्टोबर २०२४

किंमत २ रुपये । महाराष्ट्र

मराठी दैनिक

वर्ष : ०२ अंक : ५०

टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता

बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!

पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी

दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)

अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !

संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४



Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in


## नेते आमच्या मुद्यावर कधी बोलले का ?



मित्रहो....

थांबा अन थोडे लक्ष द्या, तुमच्या साठीच लिहलय हे....

आजच्या नंतर एक महिन्याने मतदान. पण जे दान आपण देतो ते केवळ नेत्यांच्या भल्यासाठी की जनतेच्या हितासाठी....?

आता निवडणूक आली आहे त्यामुळे नेते तुमच्या कडे भिकाऱ्याचे रूप धारण करून येणारं यात शंका नाही. पण आजी माजी नेत्यांनी आजवर काय काय केले ? आणि भावी नेते खऱ्या जनहितार्थ पुढे काय करणार ? यांचे उत्तर ते देऊ शकतात का ?

याचा थोडा धुंडाळा घेणे हे, लोकशाहीचे कर्णधार या नात्याने तुमचे आद्य कर्तव्य आहे. यावर आधी थोडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

थोडे उदाहरणासह बोलू....

आपला बुलढाणा जिल्हा हा मातृतीर्थ अर्थात राष्ट्रमाता जिजाऊंच्या माहेराचा तसेच छत्रपतींच्या आजोळाचा जिल्हा....

त्यामुळेच सिंदखेड राजा नगरीचे

ऐतिहासिक महत्त्व वेगळेच.

एवढेच नाही तर तिच्या शीवेवरंच नव्हे, हाकेच्या अंतरावर जागतिक कीर्तीचे, चंद्रावरील दगड मातीशी सख्खे नाते सांगणारे पृथ्वीवरील पापडखाराचे एकमेव लोणार

सरोवर....!

आणि शेजारीच भगवान बुद्धांच्या धम्म संस्कृतीच्या सुवर्णकालीन वैभवाची साक्ष देणारी अजिंठा लेणी सुध्दा !

थोड्या वेगळ्या शब्दात सांगायचे झाल्यास अवघ्या विश्वातून कोट्यवधी पर्यटकांना जीवनात एकदा तरी भेट द्यावीशी वाटण्याची ही एकमेवाद्वितीय केंद्रे. आणि तसे झाल्यास अनगिणत निधीचा देशी व परदेशी चलनाच्या रूपात धबधब्याच्या पाण्यासारखा

ओघ लागण्याची ठिकाणे मातृभूमीच्या अंगावरील अलंकारासमान चमकणाऱ्या ठिकाणांचा जिल्हा.....!

पण दुर्दैवाची गोष्ट अशी की, इथे विकासाची गंगा अनेक वर्षा पासून वाहतेय, इथे गावेची गावे विकसित झालीत, रस्ते म्हणाल तर अमेरिकेच्या रस्त्यांसारखी... रोजगार म्हणावा तर इथे पुण्या मुंबईवरून लोक कामाला येतात. इथे आज पर्यंत कधी शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या नाही. कोणीच पुलावरून वाहून गेले नाही, म्हणजे येथील पुल ब्रीज सारखे उंच आहेत. इथे पर्यटन स्थळे विकसित झालीत, त्यातून अनेक गरजूंना रोजगार उपलब्ध झालाय....

आणि महत्वाचे म्हणजेआमच्या दोन तालुक्यातील मतदार संघामध्ये कधीच नेत्यांनी जातीवाद केला नहीं, येथील कोणत्याच नेत्याकडे लाखो कोटीच्या गाड्या अजिबात नाहीत. केवळ जीवन जगता येईल इतकाच मर्यादित पैसा त्यांच्या कडे आहे....

नेते नेहमी गरजूंना मदत करतात गावोगावी जातात. शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लावतात. असे निष्ठावंत राजकारणी आमच्या मतदार संघाला लाभलेत....

असे म्हणता येण्यासारख येथे कधी घडले आहे का....?

अस यातलं काहीच आमच्या मतदार संघात घडलेलं नाही हीच शोकांतिका...

असो ! या बद्दलही आपल्याला काही बोलायचं नाही.. कारण गाढवाला सिंह देखील आपणच केलं हेही तितकेच खरे...

पण आमची भावंडं इथे काम नाही म्हणून आपल्या पोटाची खळगी भरायला पुण्या मुंबईत रोज आपल्या आयुष्याची माती करतात त्याचे काय? आई वडिलांना सोडून नाईलाजाने ते तिकडे राहतात. मग मतदार संघ विकसित कुठे झालाय ते दाखवा? अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा....

पण त्या पूर्ण होण्यासाठी इथे मूलभूत बाबी आहेत का?

जर गावाकडे रोजगार असेल, शेतीला पुरेसं पाणी मिळालं तर कोणालाही भटकण्याची वेळ येणार नाही असे मला वाटते. अहो गावाकडे एखादा नागरिक मेला तर त्याला मुले पुण्या-मुंबई वरून येई पर्यंत झाकून ठेवावे लागते, ही परिस्थिती इथे आहे.

मित्रहो नेता कधीच निस्वार्थी नसतो. इथे कार्यकर्ते आपल्या जागेवर आहेत. पण नेत्यांनी निष्ठा विकलेली दिसते. नेते गेले पण कार्यकर्ते आहेत. याला काय म्हणावं...

पॉइंट टू पॉइंट बोलायचं झालं तर आमचा विकास चोरीला गेलाय आणि प्रगती तर कित्येक वर्षांची कुण्याभलत्याचा हात धरून पळून गेलीय. अस म्हणायला वागवं ठरणार नाही.

आमच्या शहरांसाठी लाखो नव्हे तर कोटीच्या कोटी निधी आलाय मागील काही वर्षात पण गेला कुठे हे आम्हला देखील कळाले नाही. मग बाहेरच्यांनी न बोललेले बरे. कारण आम्ही इथे राहणारे सर्व लोक मूर्ख आहोत.

याचा आम्ही कधी विचार करणार आहोत का....?

हा माझा तुम्हाला सवाल आहे....!

त्यासाठी हा प्रपंच....!

वाचाल तर वाचाल....!!




ज्ञानेश्वर सुरेश बुधवत

मुख्यसंपादक दैनिक लोकनेता

संस्थापक - विश्व फाउंडेशन म. राज्य

मातृतीर्थ सिंदखेड राजा

मो. न. ९९६०२०९१४९


### प्रतेक कर्मचाऱ्यांनी विधानसभा निवडणुकीत

# आपली जबाबदारी योग्यरीत्या पार पाडावी-प्रा.संजय खडसे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**



विधानसभा निवडणुकीला प्राधान्य देऊन प्रत्येक कर्मचाऱ्यानी आपली जबाबदारी योग्यरीत्या पार पाडण्याचे आवाहन निवडणुकीत निर्णय अधिकारी प्रा संजय खडसे यांनी आज दि. २३ आक्टोबर रोजी पंचायत समिती सभागृहात आयोजित विधानसभा निवडणुकीच्या आढावा बैठकीत केले.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करीता निवडणूक कार्यक्रम२४ - सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघातील सर्व नोडल अधिकारी तसेच सर्व कर्मचारी यांची आज दिनांक २३ ऑक्टोबर २०२४ रोजी आढावा बैठक पंचायत समिती सभागृह सिंदखेडराजा येथे मा.निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा.संजय खडसे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. आजच्या बैठकीमध्ये मा. खडसे यांनी विधानसभा निवडणुकीच्या सर्व बाबींचा आढावा बैठकीमध्ये घेतला. प्रत्येक कर्मचाऱ्यांनी आपापली जबाबदारी योग्यरीत्या पार पाडून, विधानसभा निवडणुकीला प्राधान्य देऊन प्रक्रिया पूर्ण करावी यासाठी जमलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. तसेच विधानसभा निवडणूक २०२४ ही यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी सर्व अधिकारी/ कर्मचाऱ्यांनी आपापली जबाबदारी योग्यरीत्या पार पाडावी असे प्रा. खडसे यांनी सर्वांना आवाहन केले.

निवडणूकिसाठी लागणारे साहित्य तसेच पोलिंग बूथ वर लागणारे साहित्य या सर्वांचा आढावा घेऊन कोणतेही साहित्य कमी पडणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना संबंधित सेल च्या नोडल अधिकारी यांना करण्यात आल्या.

मा. खडसे यांनी आचारसंहितेचे पालन करताना कोण कोणत्या गोष्टींची काळजी घ्यायची याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले, सर्व निवडणुकीतील कर्मचारी / अधिकाऱ्यांकडून कोणतीही चूक होऊ नये याची दक्षता घेण्याचे सुद्धा सर्वांना आवाहन केले तसेच आचारसंहितेचे पालन करून योग्य प्रकारे आपापली कामे कशी करावी यासाठी मार्गदर्शन केले.

विधानसभा निवडणुकीला प्राधान्य देऊन सर्व प्रक्रिया यशस्वी रित्या पार पाडण्याचे आवाहन केले...

आजच्या बैठकीला मा.तहसीलदार सिंदखेड राजा अजित दिवटे , मा. गटविकास अधिकारी देऊळगाव राजा मुकेश माहोर ,मा.निवडणूक नायब तहसीलदार मनोज सातव ,मा. निवडणूक नायब तहसीलदार देऊळगावराजा प्रवीण घोटकर,मा. नायब तहसीलदार सिंदखेडराजा अस्मा मुजावर, मा. नायब तहसीलदार सिंदखेडराजा श्री. प्रवीणकुमार वराडे, मा. नायब तहसीलदार देऊळगाव राजा सायली जाधव,मा. नायब तहसीलदार देऊळगाव राजा प्रांजल पवार, तसेच सर्व नोडल अधिकारी व प्रसारमाध्यम प्रतिनिधी प्रकाश शिंदे,व संजय सोनुने उपस्थित होते.

## कुमारी रुपाली चौधरी राज्यस्तरीय महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नाशिक। प्रतिनिधी**

पुणे येथे व्ही. एस. व्ही. एस. एस. सोशल फाउंडेशनच्या वतीने नुकताच बहुचर्चित बहु मानांकित राज्यस्तरीय महाराष्ट्र गौरव पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील अतुलनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. यात ग्रामिण भागातून उत्तर महाराष्ट्रातून धुळे जि. ग्रामिण विभागीय पिंपळनेर गावची भूमिकन्या,वक्तृत्वाची हिरकणी म्हणून ओळख असलेली कुमारी रुपाली कन्हैयालाल चौधरी हीचे सामाजिक,साहित्यिक,सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या महत्वपूर्ण कामगिरीबद्दल राज्यस्तरीय महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मागे देखील तिला नाशिक येथे राज्यस्तरीय महाराष्ट्र नारीशक्ती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.सध्या ती कायद्याचे शिक्षण घेत आहे.

ह्या कार्यक्रमात पुरस्कार्थींचा प्रतिनिधी म्हणून सत्काराला उत्तर देताना आपल्या अभ्यासपूर्ण खुमासदार भाषाशैलीमध्ये सर्वांना मंत्रमुग्ध करून प्रत्येकाने आपण समाजाचे देणे लागतो ही भावना जोपासावी.पुरस्कार प्रेरणा देतात.प्रेरणेने राष्ट्र निर्माण होते व पर्यायाने समाजाची व देशाची प्रगती होते असे मत व्यक्त केले.व मला याठिकाणी घडवण्यामागे माझे गुरुवर्य प्रा.डी.टी.पाटील व आई वडील यांचे मार्गदर्शन मोलाचे आहे.ह्याचे श्रेय माझ्या गुरुवर्यांना देते असे तिने भाषणातून गुरुवर्यांचे व ज्यांनी सन्मानित केले त्या संस्थेचे ऋण व्यक्त केले. अत्यंत प्रतिष्ठेचा व मानाचा समजला जाणारा हा पुरस्कार,विद्यानिकेतन सामाजिक व शैक्षणिक संस्था, कोचळेवाडीचे संस्थापक अध्यक्ष श्री.शशिकांत कोचळे सर यांनी सुयोग्यरित्या आयोजन केले होते.ह्या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून भारतरत्न डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्याबरोबर काम केलेले तत्कालीन सहकारी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ.अशोक नगरकर सर,पुणे,तसेच भिडेवाडाकार श्री.विजय वडवेवार,आणि सिनेअभिनेते श्री.अशोक नलावडे व सिनेअभिनेत्री प्रियंका शिंदे उपस्थित होत्या.ह्या गौरवशाली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्मिता जोशी यांनी केले. कुमारी रूपाली चौधरीचे सगर रत्न परिवाराचे ड बापूसो संभाजी पगारे, डॉ. साहेबराव क्षीरसागर, आर. जे. पाटील, आर. के. पाटील, ललितभाऊ साळवे, साहेबराव तात्या नंदन यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

## ठरलं... हर्षवर्धन पाटील आज दाखल करणार उमेदवारी अर्ज

### खा.सुप्रिया सुळें राहणार उपस्थित ;वाघ पॅलेस येथे स.१० वा.कार्यकर्ता मेळावा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

**बारामती लोकसभेबरोबर इंदापूर विधानसभेत तुतारी च..!**

**माजी मंत्री हर्षवर्धन पाटील हे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार म्हणून इंदापूर मतदारसंघातून गुरुवारी अर्ज दाखल करणार असल्याने पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. बारामती लोकसभेबरोबर इंदापूर विधानसभेतही शरदचंद्रजी पवार साहेब यांचे नेतृत्वाखाली तुतारीचा बोलबाला वाढत असल्याचे चित्र इंदापूर तालुक्यात निर्माण झालेले आहे.**

माजी मंत्री हर्षवर्धन पाटील हे इंदापूर विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार म्हणून गुरुपुष्पामृतच्या मुहूर्तावर गुरुवारी (दि.२४) उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.यावेळी खा.सुप्रिया सुळे उपस्थित राहणार आहेत.तत्पूर्वी,वाघ पॅलेस येथे सकाळी १० वा.खा.सुप्रिया सुळे,हर्षवर्धन पाटील आदी मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांनी हर्षवर्धन पाटील यांना इंदापूर विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अधिकृत उमेदवार म्हणून एबी फॉर्म दिला आहे. दरम्यान,हर्षवर्धन पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा.शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील,खा. सुप्रियाताई सुळे यांचेसह पदाधिकारी, कार्यकर्ते यांचे इंदापूर विधानसभेसाठी पक्षाच्या उमेदवारीबद्दल आभार व्यक्त केले आहेत.

# डिझेल चोरी करणाऱ्या दोघांस आळेफाटा पोलिसांनी केले जेरबंद;१ लाखांचा मुद्देमाल जप्त

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आळेफाटा । मयूर ढोबळे**



आळेफाटा पोलिस स्टेशन कडुन मिळालेल्या माहितीनुसार आळे (ता.जुन्नर) गावच्या हद्दीत सोपान लक्ष्मण शिरतर रा.आळे ता. जुन्नर जि. पुणे यांच्या मालकीचे टाटा कंपनीची १२ टायर गाडी क्रमांक एम.एच. १४ ई.एम ७१६७ ही यामधील २०० लीटर डिझेल कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी अज्ञात चारचाकी वाहनातून येवून चोरी करून नेलेबाबतचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हा उघडकीस आणण्याच्या सुचना गुन्हे शोध पथकास देण्यात आल्या. त्यानुसार गुन्हे शोध पथक हे सदर गुन्हयातील आरोपींचा व गुन्हयातील वापरलेल्या वाहनाचा शोध घेत असताना, नमुद गुन्हे शोध पथकाला गोपनिय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, इसम नामे १) गणेश लक्ष्मण क्षिरसागर वय २२ वर्षे रा. वाकी खुर्द ता. खेड जि. पुणे. २) प्रतिक मुकुंद फापाळे वय २१ वर्षे रा. पाटीलनगर, वाकी खुर्द ता. खेड जि.पुणे हे सुट्टया पध्दतीने डिझेलची विक्री करत असल्याची खात्रीशिर बातमी मिळाल्याने गुन्हे शोध पथकाने वरील दोन आरोपीस ताब्यात घेवून त्यांच्याकडे अधिकचा तपास केला असता त्यांनी गुन्हा हा त्यांच्या साथिदारांसह केला असल्याची कबुली दिल्यानंतर सदर गुन्हयाचे तपासकामी अटक करण्यात आली आहे तसेच फरार आरोपींचा शोध चालू आहे. आरोपींकडून गुन्हयात वापरलेली क्रियटा कार एम.एच १२ व्ही. व्ही ०८९६ अंदाजे अंदाजे ८ लक्ष व १ लाख ४३१ रुपयांचे डिझेल असा एकुन ९ लाख ४३१ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.सदरची कामगिरी हि पुणे ग्रामीण चे पोलिस अधीक्षक पंकज देशमुख,अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलिस अधिकारी रविंद्र चौधर यांच्या मार्गदर्शनाखाली दिनेश तायडे यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे सहा. पोलीस उपनिरक्षक चंद्रा डुंबरे, पो. हवालदार राजेंद्र हिले, भिमा लोंढे, विनोद गायकवाड, संजय शिंगाडे, पंकज पारखे, पंडीत थोरात, पोलीस अंमलदार अमित माळुंजे, नविन अरगडे, गणेश जगताप, ओंकार खुणे, तौफिक शेख, विष्णु दहिफळे यांनी केली आहे.

# मुस्लिम बांधवांचा प्रचंड मेळाव्यात माजी आ.भिमराव धोंडे यांना एकमुखी पाठिंबा

## राजकीय जिवनात प्रथमच घेतलेल्या मुस्लिम मेळाव्यास मोठा प्रतिसाद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**




आष्टी येथे माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित प्रचंड मेळाव्यात मुस्लिम बांधवांनी माजी आमदार भीमराव धोंडे यांना एकमुखी पाठिंबा दिला. माझ्या राजकीय जिवनात मी प्रथमच मुस्लिम बांधवांचा मेळावा घेतला असून एवढ्या प्रचंड संख्येने बांधव उपस्थित आहेत.आपल्या प्रेमाने मी भारावून गेलो आहे.माझ्या राजकारणात मतदारसंघातील दुसरी पिढी मला साथ देत आहे याचा मला अभिमान वाटतो.मी आतापर्यंत सर्व जाती धर्माच्या लोकांना बरोबर घेऊन मतदारसंघाचा विकास केला आहे असे प्रतिपादन माजी आ. भीमराव धोंडे यांनी मेळाव्यात बोलताना केले.

आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आ.भीमराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी आष्टी येथे मतदारसंघातील अल्पसंख्याक (मुस्लिम) समाज बांधवांच्या संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी शिक्षण सभापती नियामत बेग होते.

पुढे बोलताना माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले की,मिरावली पहाडावर मी माझ्या आईसोबत लहानपणी दर्शनासाठी जात होतो.माझी आई देवी निमगाव येथेही दर्याचे दर्शन घेण्यासाठी जात होती.मी आठ वर्षांपूर्वी देवी निमगाव येथे मोठा दर्गा बांधला आहे. माजी सभापती नियामत बेग यांना मीच उर्दू शाळा सुरू करून दिली आहे तसेच पाटोदा येथे ही उर्दू हायस्कूल सुरू केले आहे.त्याचप्रमाणे माझे मित्र स्व. निजाम पटेल यांचे नाव मेहेकरी येथील शाळेला दिले आहे. लोणी येथेही सय्यदमीर बाबा यांचे शाळेला नाव दिले आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र केसरी सईद चाऊस यांनाही वेळोवेळी सहकार्य केल्याने त्यांनी कुस्तीमध्ये नावलौकिक मिळवला.आमच्या संस्थेत आठ टक्के मुस्लिम बांधव कर्मचारी आहेत.मी विकास कामे करताना कोणत्याही कामात कधीच कमिशन घेतले नाही भविष्यातही घेणार नाही. अनेक मुस्लिम बांधव परिस्थितीने आर्थिक दृष्ट्या गरीब आहेत. मुस्लिम समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी आहे त्यांनी आपल्या पाल्यांना चांगले शिक्षण द्यावे व मोठे करावे, शिक्षणाने सर्वांगीण विकास होतो. शिकण्यासाठी शिष्यवृत्ती मिळते याचा लाभ घ्यावा. मतदारसंघातील सर्व जाती धर्माच्या सर्वांगीण विकासासाठी मला आपण साथ द्यावी असे आवाहन माजी आमदार भीमराव धोंडे यांनी शेवटी केले. मेळाव्याच्या निमित्ताने ग्रामपंचायत सदस्य नाशिर पठाण यांनी कार्यकर्त्यांसह माजी आमदार भीमराव यांच्या गटात प्रवेश केला.यावेळी मौलाना अब्दुलभाई यांनी सांगितले की,सर्वसामान्य कुटुंबातील नियामत बेग यांना जि.प.सदस्य करुन सभापती बनविले,सईद चाऊस यांना वेळोवेळी सर्व प्रकारचे सहकार्य करीत महाराष्ट्र केसरी पर्यंत पाठविले,सादिक कूरेशी यांना पं.स.सदस्य केले,जिल्ह्याला सर्व प्रथम शिक्षण सभापतीपद देण्याचे काम माजी आमदार धोंडे यांनी केले. यावेळी युवा नेते अजयदादा धोंडे,जेष्ठ नेते इकबालभाई पेंटर,उपसभापती पांडुरंग नागरगोजे,रिपाइंचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे,सय्यद शहाबुद्दीन,शाहिद कादरी,डॉ. मुश्ताक शेख व इतरांची भाषणे झाली.कार्यक्रमास युवा नेते अजयदादा धोंडे, माजी सभापती साहेबराव म्हस्के ,जि.प.सदस्या वर्षा माळी,उपसभापती पांडुरंग नागरगोजे,अभयराजे धोंडे, शंकरराव देशमुख,माजी जि.प. सदस्य रामराव खेडकर,रामदास बडे, अशोक सव्वाशे, रिपाइंचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे, महाराष्ट्र केसरी सईद चाऊस, दिलीपराव म्हस्के,माजी सभापती सुवर्णाताई लांबरुंड, माजी सरपंच बाळासाहेब पवार, काकासाहेब लांबरुंड,किशोर खोले,माजी जि.प.सदस्य सतिश झगडे,माजी सरपंच चंद्रशेखर साके,माजी पं.स.सदस्य संजय धायगुडे,बाबुराव कदम,जमीर पठाण, ड.सय्यद अशरफ,आस्तकाभाई शेख,खालिद भाई शेख,नवनाथ सानप,बाजीराव वाल्हेकर, शेरखान पठाण,कलीम पठाण, खुर्षीद सर,फय्युम पठाण, रघुनाथ शिंदे,आदम पठाण,निजाम बेग,जाऊभाई शेख,जमील शेख,चांदभाई कारेगाव वाले,सलीम चाऊस, इस्माईल पठाण,दिलावर पठाण,माजी सभापती अनिल जायभाय,महेबुबभाई,राजपाल शेंडगे,मोहम्मद हसन चाऊस, शेरखान पठाण,रिजवान बिल्डर,कुप्पा शेख,सरपंच दादासाहेब जगताप,सय्यद वाजेद फौजी,सय्यद मतीन,असलम पठाण,मोमीन शेख,अन्सार कुरेशी,हादी शेख, अज्जुभाई शेख,निसार सय्यद, मौलाना गुलाम हापीज,मौलाना अब्दुल हाजी,अख्तरभाई, निसारभाई सौदागर,सय्यद साजिद,इस्माईल तांबोळी, सलमान पठाण,हमीदभाई शेख, मोहसिन कुरेशी,बाबुलाल पठाण,निजामभाई शेख,डॉ. अकिल, मोहंमद करदुस, राजु भाई शेख, गुलाब शेख, अमर शेख,मौलाना हबीब, अय्यास कुरेशी,अल्ताफ सय्यद,देविदास शेंडगे,आदेश निमोणकर यांच्यासह आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ.विनोद ढोबळे व प्रा.खेमगर यांनी केले व उपस्थित त्याचे आभार अज्जुभाई शेख यांनी मानले.

# कर्मयोगी साखर कारखान्यातर्फे सभासदांना २०० रुपयांचा हप्ता बँकेत जमा

## कर्मयोगी गळीत हंगामासाठी सज्ज राजवर्धन पाटील यांची माहिती



लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर | बबनराव धायतोंडे**

इंदापूर तालुक्यातील महात्मा फुलेनगर (बिजवडी) येथील कर्मयोगी शंकररावजी पाटील सहकारी साखर कारखाना व शहाजीनगर येथील नीरा भीमा सहकारी साखर कारखान्याकडून गळीत हंगाम सन २०२३-२४ साठी ऊस बिलाचा दिवाळीसाठी प्रति टन रु. २०० प्रमाणे हप्ता हा शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये आज मंगळवारी (दि.२२) वर्ग करण्यात आला आहे,अशी माहिती कर्मयोगी शंकररावजी पाटील कारखान्याचे संचालक राजवर्धन पाटील व निरा भिमा कारखान्याचे अध्यक्ष लालासाहेब पवार यांनी इंदापूर येथे मंगळवारी (दि.२२) दिली.

माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांचे नेतृत्वाखाली हे दोन्ही कारखाने उत्कृष्टरित्या कार्यरत आहेत.या दोन्ही कारखान्यांनी यापूर्वी शेतकऱ्यांना २७०० रुपये प्रमाणे ऊस बिलाची रक्कम वेळेवरती अदा केलेली आहे. कर्मयोगी शंकररावजी पाटील व निरा भिमा कारखान्याच्या संचालक मंडळाच्या बैठकीत शेतकऱ्यांना ऊस बिलाचा दिपावलीसाठी २०० रुपये प्रमाणे हप्ता देण्याचा निर्णय घेण्यात आला,अशी माहिती राजवर्धन पाटील व लालासाहेब पवार यांनी दिली.

तसेच या दोन्ही कारखान्याच्या कर्मचाऱ्यांना एक महिन्याचा पगार बोनस म्हणून दिवाळीसाठी देण्यात येणार आहे. आगामी सन २०२४-२५ च्या गळीत हंगामासाठी दोन्ही कारखाने सज्ज झाले आहेत.आगामी गळीत हंगाम यशस्वी करणेसाठी सर्वांनी सहकार्य करावे,असे आवाहन याप्रसंगी त्यांनी केले.

या दोन्ही कारखान्यांमध्ये कामगारांचे पगार नियमितपणे होत आहेत,मात्र गैरसमज निर्माण केला जातो, कारखान्याचे बदनामी केली जात आहे. कारखान्या संदर्भात चुकीच्या गोष्टी करू नका,या संस्था शेतकऱ्यांच्या आहेत,असे आवाहन यावेळी राजवर्धन पाटील यांनी केले.याप्रसंगी नीरा भीमा कारखान्याचे संचालक विलासराव वाघमोडे यांनी मनोगत व्यक्त केले.यावेळी दोन्ही कारखान्याचे संचालक मंडळ,कार्यकारी संचालक उपस्थित होते.

**विरोधक सहकारी संस्था का काढत नाहीत?- राजवर्धन पाटील**

विद्यमान लोकप्रतिनिधीकडे दुग्धविकास खाते होते,तरीही त्यांनी तालुक्यामध्ये दुध डेअरी का काढली नाही? १० वर्षाच्या काळात त्यांनी सहकारी संस्था का निर्माण केल्या नाहीत? तसेच १० वर्षात एकही शाळा-महाविद्यालय का काढले नाही? विद्यमान लोकप्रतिनिधी संचालक असलेल्या छत्रपती कारखान्याची २ वर्षे वार्षिक सर्वसाधारण सभा का घेतली नाही? छत्रपती कारखान्याच्या सध्याच्या संचालक मंडळाला १० वर्षे होत आली तरीही निवडणूक का घेत नाहीत? या सर्व प्रश्नांची उत्तरे विरोधक का देत नाहीत, असा सवाल राजवर्धन पाटील यांनी केला.इंदापूर तालुक्यात अनेक सहकारी संस्था निर्माण करून,त्याद्वारे रोजगार निर्माण करून,सतत येणाऱ्या विविध अडचणीवर मात करून संस्था यशस्वीपणे चालविण्यासाठी हिम्मत लागते, ती हिंमत फक्त हर्षवर्धन पाटील यांच्याकडे आहे. हर्षवर्धन पाटील यांनी कष्ट घेऊन,सतत वेळ देऊन,त्रास सहन करून,जिद्दीने व मेहनतीने उभारलेल्या संस्थांवर राजकीय स्वार्थासाठी टीका करणे सोपे असते,असा टोला राजवर्धन पाटील यांनी विरोधकांना लागावला.

# नायगाव शहरातील अनेकांचा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटात प्रवेश



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव | माधव बैलकवाड**

नायगाव शहरातील अनेक कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरद पवार) गटाचे जिल्हाध्यक्ष भगवानराव पा. आलेगांवकर आणि सुभाषराव गोरठेकर,व राष्ट्रवादीचे संजय चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला आहे.

नांदेड येथील चंद्रलोक हॉटेल येथे दि.२२ ऑक्टोंबर रोजी आयोजित राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या विशेष बैठकीत तालुका अध्यक्ष विश्वनाथ बडूरे अशोक पा. पवार गोळेगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला. त्यात अविनाश पाटील कल्याण, भाऊसाहेब पा.कल्याण, नारायण पाटील शिंदे,सचिन वाघमारे, प्रशांत हटकर, गजानन कुंचलवाड,तिरुपती वडजे, सिद्धार्थ सोनवणे आदी प्रमुख कार्यकर्त्यांसह शहरातील असंख्य कार्यकर्त्यांचा समावेश आहे. त्यांच्या नूतन पक्ष प्रवेशा बद्दल राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील अलेगाकर, डी. बी जांभनुरकर, राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या महिला जिल्हाध्यक्षा प्रांजली रावणगावकर आदींनी त्यांचा विशेष सन्मान करीत पुढील पक्षीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# प्रबुद्ध भारताचे पुनर्निर्माण करणे हे बौद्ध समाजासमोरील आव्हान-प्रबुद्ध साठे





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**

देव धर्म जातीच्या मानसिक गुलामगिरीतून बाहेर पडून व्यवस्था परिवर्तन करून प्रबुद्ध भारताचे पुनर्निर्माण करणे हे बौद्ध समाजासमोरील म्हणजेच आंबेडकरी समाजासमोरील आव्हान आहे, जातविरहीत समाज निर्मिती हेच आपले ध्येय व आव्हान आहे, बौद्ध समाज किंबहुना आंबेडकरी समाजाकडे बौद्धेत्तर दलित बहुजन मराठा आदिवासी इत्यादी बहुजन समाजाची बघण्याची जातीग्रस्त व नकारात्मक मानसिकतेमुळेच बहुजन समाजाचे नुकसान झाले असे वास्तव प्रतिपादन चला आपल्या बुध्दाच्या घरी अभियान प्रमुख व भारतीय बौद्ध धम्म संस्कार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष प्रबुद्ध साठे यांनी केले, ते बौद्धजन पंचायत समिती कामोठे नवी मुंबई शाखा क्रमांक ८०२ व यशोधरा महिला मंडळ आयोजित धम्म चक्र प्रवर्तन दिनानिमित्त व वर्षावास समारोप समारंभ निमित्त डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची ऐतिहासिक धम्मक्रांती व बौद्धांसमोरील आव्हाने या विषयावर व्याख्यान देताना बोलत होते, रक्ताचा एक थेंबही न सांडता १४ आक्टोबर १९५६ ला मानवतेच्या युगा युगाची धम्मक्रांती केली , ज्यांना माणूस म्हणून धर्म व्यवस्थेने नाकारले होते त्यांच्या वरच बौद्ध धम्माने मानवतेची चळवळ उभी करण्याची जबाबदारी व मानवी कल्याणाचे ध्येय दिले, बुद्ध व धम्म घेऊनच आंबेडकरवादी राजकारणाची मांडणी करावी लागेल, व त्यातूनच बहुजन समाजाचे ऐक्य करून आंबेडकरवादी स्वतंत्र व स्वाभिमानी राजकारण प्रभावशाली करुया असेही प्रबुद्ध साठे यांनी म्हटले,याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष आर आर साळुंखे,नागसेनजी गमरे, सुभाष भोसले (अमेरिका स्थित),एन एम वाघमारे,सुधाकर गायकवाड,भारत हातागळे, वंचित बहुजन आघाडी चे महेंद्र भाई आसुरडेकर,आदी मान्यवर उपस्थित होते,यावेळी ड सानिया साळुंखे यांच्या सह इतर यशस्वी मुलींचा सत्कार करण्यात आला कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बौद्धजन पंचायत समिती चे रमाकांत जाधव, चंद्रकांत कांबळे,रमेश घाडगे, विश्वनाथ जाधव,राजेश जाधव, महेंद्र पाटील,सुबोध जाधव, रमेश कांबळे तसेच यशोधरा महिला मंडळ च्या रसिका जाधव,वैशाली जाधव,रेणुका साळुंखे,कमल घाडगे,रोहिणी जाधव,पुजा कांबळे,वैशाली कांबळे, सुकेशनी जाधव आदींनी प्रयत्न केले.

# आष्टी तालुका आम आदमी पार्टी अध्यक्ष डॉ.महेश नाथ यांचा राजीनामा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**



आष्टी तालुक्याचे आम आदमी पार्टी अध्यक्ष डॉ. महेश नाथ यांनी आपल्या पदाचा आणि पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. राजीनाम्याचे कारण म्हणून त्यांनी वाढत्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जबाबदाऱ्या सांगितल्या आहेत.

डॉ.नाथ यांनी आपल्या राजीनाम्यात नमूद केले आहे की,गेल्या काही काळात त्यांनी पक्षाच्या वाढीसाठी आणि समाजसेवेसाठी काम केले आहे,ह्या संधीबद्दल ते अत्यंत आभारी आहेत.तथापि,सध्या त्यांच्या दंतचिकित्सक व्यवसायाच्या वाढत्या मागण्यांमुळे त्यांना पक्षाच्या कामासाठी आवश्यक वेळ आणि श्रम देणे शक्य होत नाही.

डॉ.नाथ यांनी पक्षाच्या निवडणूक धोरणावर देखील भाष्य केले आहे.त्यांनी सांगितले की,पक्षाने महाराष्ट्रात अद्याप एकही निवडणूक लढवलेली नाही आणि निवडणुका न लढवल्यास पक्षाच्या वाढीची शक्यता कमी आहे.त्यांनी नमूद केले की, चांगले काम करणाऱ्यांना टाळले जात आहे आणि त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते,ज्यामुळे पक्षाच्या वाढीवर मर्यादा येत आहेत.

त्यांनी असेही म्हटले आहे की, पक्षाच्या यापुढील वाढीची कोणतीही स्पष्ट दिशा नसल्यामुळे त्यांनी हा निर्णय घेतला आहे.विनाकारण काम करण्यात काही अर्थ नाही. त्यापेक्षा कोणत्या दुसऱ्या चांगल्या सामाजिक अथवा राजकीय कामांमध्ये वेळ दिला तर योग्य राहील, असेही त्यांनी म्हटले आहे. डॉ.महेश नाथ यांनी त्यांच्या राजीनाम्याद्वारे आपल्या पदाचा त्याग करत असताना,पक्षाने त्यांच्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल आभार मानले आहेत.

# आष्टी विधानसभा निवडणुकीसाठी ४४० मतदान केंद्रांवर ३ लाख ८३ हजार ३० मतदार बजावणार मतदानाचा हक्क - निवडणूक निर्णय अधिकारी वसीमा शेख

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**



आष्टीच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून आष्टी विधानसभा मतदारसंघासाठी जवळपास तीन लाख ८३ हजार ३० मतदार ४४० मतदान केंद्रावर आपल्या मतदानाचा हक्क बजावणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी वसीमा शेख यांनी पत्रकार परिषदेत दिली.राज्यात सर्वात मोठा मतदार संघ म्हणून २३१ आष्टी मतदारसंघात आष्टी सोबत पाटोदा ,शिरूर तालुक्यातील मतदार हे आपल्या मतदानाचा हक्क बजावणार आहे यासाठी मतदार संघात मतदानावेळी अनुचित प्रकार घडू नये यासाठी एफ एस टी,बी एस टी,बी एस टी या विशेष पथकाची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती निवडणूक वासिमा शेख यांनी दिली. आष्टी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मंगळवार दि २२ ऑक्टोबर रोजी तहसील कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी वसीमा शेख यांनी पत्रकार परिषद आयोजित केली होती.यावेळी तहसीलदार वैशाली पाटील, नायब तहसीलदार बाळदत्त मोरे, नायब तहसीलदार प्रकाश सिरसेवाड उपस्थित होते.आष्टी विधानसभा मतदारसंघात एकूण ३ लाख ८३ हजार ३० मतदार आहेत. तर कर्मचारी ३५००ते ४००० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.तसेच नामनिर्देशन पत्र देण्याची व घेण्याची वेळ सकाळी १० ते ३ वाजेपर्यंत वेळ ठेवण्यात आली आहे.सर्व नागरिकांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करावे असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी वसीमा शेख यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली.

# रविकांत तुपकरांनी केली क्रांतिकारी शेतकरी संघटनेची स्थापना

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**



राज्यात शेतकरी चळवळ पुढे नेण्यासाठी तसेच जनसामान्यांच्या समस्यांवर आवाज उठवण्यासाठी रविकांत तुपकर यांनी बिगर राजकीय सामाजिक संघटनेची स्थापना केली आहे. क्रांतिकारी शेतकरी संघटनेची घोषणा त्यांनी आज २२ ऑक्टोबर रोजी बुलढाणा येथे झालेल्या राज्यातील पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत केली. चळवळीचे अस्तित्व कायम ठेवून क्रांतिकारी शेतकरी संघटना महाविकास आघाडीसोबत जाण्यास सकारात्मक असल्याचा निर्णय ही या बैठकीत घेण्यात आला. महाविकास आघाडी सोबत बोलणे झाले असून महाविकास आघाडी कडून सकारात्मक निर्णय होईल, अशी अपेक्षा देखील देखील रविकांत तुपकर यांनी या बैठकीत व्यक्त केली.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी आज २२ ऑक्टोबर रोजी राज्यभरातील कार्यकर्त्यांची तातडीची बैठक बोलावली होती. बुलडाणा शहरातील गोलांडे लॉन्स येथे ही बैठक पार पडली. या तातडीच्या आणि महत्त्वपूर्ण समजल्या जाणाऱ्या बैठकीत रविकांत तुपकर नेमकी काय भूमिका जाहीर करतात या याकडे संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष लागून होते. अखेर या मेळाव्यात रविकांत तुपकर यांनी मोठा निर्णय घोषित केला. स्वाभिमानी शेतकरी संघटनेतून तुपकरांना बाजूला केल्यानंतर शेतकरी चळवळ पुढे नेण्यासाठी आपली वेगळी अशी स्वतंत्र संघटना असावी, अशी मागणी राज्यभरातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांची होती त्यानुसार रविकांत तुपकरांनी सर्वांशी चर्चा करून स्वतंत्र संघटना स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. अखेर रविकांत तुपकरांनी क्रांतिकारी शेतकरी संघटनेची घोषणा आज बुलढाण्यात झालेल्या राज्यातील पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत केली. रविकांत तुपकरांच्या या घोषणेचे उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले. क्रांतिकारी शेतकरी संघटना आता राज्यभर अधिक व्यापक पद्धतीने काम करणार आहे. ही संघटना केवळ शेतकऱ्यांपुरतीच मर्यादित राहणार नसून समाजातील प्रत्येक घटकासाठी ही संघटना काम करणार आहे. बिगर राजकीय सामाजिक संघटना म्हणून ही संघटना राज्यभरात आक्रमकपणे काम करेल, असे रविकांत तुपकर यांनी यावेळी सांगितले.

सध्या विधानसभा निवडणुका सुरू आहेत. या निवडणुकीत आपल्यासमोर सध्या ४ पर्याय आहे. पहिला पर्याय महाविकास आघाडीचा, दुसरा महायुतीचा, तिसरा वंचित बहुजन आघाडीचा आणि चौथा पर्याय म्हणजे स्वतंत्र लढणे आहे. त्यावर काय करायचे..? तुमच्या मनात काय आहे, असे विचारताच महाविकास आघाडीसोबत जाण्यास प्राधान्य द्यावे, जर ते सकारात्मक झाले नाही तर सर्व पर्याय आपल्यासमोर खुले आहेत, असे उपस्थित पदाधिकाऱ्यांनी सांगितले. दरम्यान आपली महाविकास आघाडी सोबत सकारात्मक चर्चा सुरू असून महाविकास आघाडी कडून सकारात्मक निर्णय होईल, अशी अपेक्षा आहे, असे देखील रविकांत तुपकरांनी यावेळी सांगितले. क्रांतिकारी शेतकरी संघटना म्हणून आपले स्वतंत्र अस्तित्व कायम राहील, निवडणूक कोणत्या सिम्बॉलवर लढवायची हे ठरवू, या संदर्भात आपली १० जणांची कोअर कमिटी निर्णय घेईल. तुमच्या मनाप्रमाणे निर्णय होणार आहे त्यामुळे ताकदीने कामाला लागा, असा सूचक इशाराही रविकांत तुपकर यावेळी यांनी दिला. दोन दिवसात अधिकृतपणे निर्णय जाहीर होईल, अशी अपेक्षा आहे, त्यादृष्टीने तयार रहा असेही तुपकरांनी सांगितले.

### रुग्णांच्या सोयीसाठी देशभरात जनऔषधी केंद्रांची संख्या वाढवणे

# हे केंद्रीय आरोग्य विभागाचे उद्दिष्ट केंद्रिय आयुष मंत्री प्रतापराव जाधव





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

आयुष्यमान भारत व महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून रुग्णांना जास्त खर्चाच्या व दुर्धर आजारांच्या बाबतीत मोठी मदत झाली असून रुग्णांच्या सोयीसाठी देशभरात जन औषधी केंद्रांची संख्या वाढवणे व स्वस्त दरात औषधी उपलब्ध करून देणे, हे पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखालील केंद्रीय आरोग्य मंत्रालयाचे उद्दिष्ट आहे, असे विचार केंद्रीय आयुष, आरोग्य ,कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केले.

सुलतानपूर येथील श्रीराम मल्टीस्पेशालिटी रुग्णालयाच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त आयोजित भव्य आरोग्य मेळाव्याचे उद्घाटन नामदार जाधव यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. आमदार संजय रायमुलकर समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रमुख अतिथी म्हणून शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रा. बळीराम मापारी, डॉ. केशव अवचार ,डॉ. वैभव मापारी, डॉ. शिव तेजणकर, डॉ. संजय लाहोटी ,वामनराव झोरे, कैलास पारिख प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. पाहुण्यांचे स्वागत हेमराज लाहोटी, डॉ. शेषराज लाहोटी, डॉ. ज्योती लाहोटी, सरपंच किरणताई लाहोटी ,डॉ. संजय लाहोटी यांनी केले. प्रासविकातून लाहोटी यांनी रुग्णालयाच्या प्रगतीची माहिती दिली. आपल्या भाषणात नामदार प्रतापराव जाधव पुढे म्हणाले की, गोरगरीब रुग्णांना दुर्धर आजार प्रसंगी मोफत सेवा उपलब्ध व्हावी म्हणून केंद्र शासनाच्या आयुष्यमान भारत योजना व राज्य शासनाची महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून भरीव मदत झाली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुरू केलेल्या मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या माध्यमातून बुलढाणा जिल्ह्यात १३ कोटी रुपये रुग्णांना देण्यात आले. आगामी काळासाठी वैद्यकीय महाविद्यालयांमधील प्रवेशाची संख्या वाढवण्यात आली आहे. महाराष्ट्रात ठाणे, नागपूर व गोवा येथे एम्सची अत्याधुनिक रुग्णालये आहेत .ही संख्या भविष्यात वाढवण्याचा प्रयत्न आहे.

आपल्या भाषणात आमदार संजय रायमुलकर यांनी श्रीराम मल्टीस्पेशालिटी रुग्णालयाच्या रुग्णसेवेचे कौतुक करून या परिसरातील सर्व डॉक्टरांनी रुग्णांना अल्प मोबदल्यात चांगली सेवा द्यावी ,असे आवाहन केले. यावेळी डॉ .जाधव,डॉ. दर्शन कुलट डॉ. दळवी देसाई, गणेश बोचरे, आदींसह इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केशव सोनुने यांनी केले.

# नांदेड पोलिस विभागाचे समाज माध्यमांना आवाहन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**



सर्व ग्रुप ॲडमिन व सभासद समाजमाध्यम (सोशल मिडीया) यांना नांदेड पोलीस विभागाकडुन आवाहन करण्यात येते की, ज्याअर्थी आपले गावात शहरात सोशल मिडीया माध्यमातुन एकमेकांशी संवाद साधत आहात. विधानसभा सार्वत्रिक निवडणुका २०२४ चे अनुषंगाने संपूर्ण महाराष्ट्रभर दिनांक १५/१०/२०२४ रोजी पासुन आदर्श आचारसंहिता लागू असून निवडणुक प्रक्रिया व मतमोजणी प्रक्रिया होणार असून दरम्यान मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांचे आदेशान्वये नांदेड जिल्हास्थळ सिमेच्या हद्दीमध्ये महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम अन्वये ३७(१)(३) चे प्रतिबंधक आदेश तसेच भारतीय नागरीक सुरक्षा संहिता-२०२३ चे कलम १६३ अन्वये निर्बंध घालण्यात आले आहेत.

त्याअर्थी मतदान प्रक्रिया व प्रचारादरम्यान आपणास खालीलपैकी कोणतेही गैरकृत्य परावृत्त होणेकरीता खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१) कोणत्याही उमेदवाराशी संबंधित त्याचे वैयक्तीक, कौटुंबिक अगर सामजिक स्तरावर अवहेलना होईल असे आक्षेपार्ह टिकाटिपण्णी करणे मजकुर फोटो, व्हिडीओ, (एडिट मार्किंग) करून प्रसारीत करणे अथवा आलेल्या संदेशावर आपले आक्षेपार्ह मत प्रकट करणे व पुढे पाठविणे.

२) मतदाराचे मन वळविण्यासाठी कोणत्याही धर्माच्या लोकांच्या धार्मिक भाषिक तसेच जातीत व्देष पसरविणारे आक्षेपार्ह मजकूर फोटो, व्हिडीओ, (एडिट मार्किंग) करून प्रसारीत करणे.

३) निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय एकात्मतेला बाधा निर्माण होईल अशा प्रकारचे स्वतंत्र सोशल मिडीया ग्रुप तयार करून त्याव्दारे आक्षेपार्ह मजकूर फोटा, व्हिडीओ, (एडिट मार्किंग) करून प्रसारीत करणे अथवा कृत्य करणे.

४) कुठल्याही व्हॉटसअप ग्रुपमध्ये आचारसंहितेचा भंग होईल अथवा दोन गटात वाद होईल अशी पोस्ट अथवा मजकूर फोटो, व्हिडीओ टाकल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित व्यक्तीसह ग्रुप ॲडमीन जबाबदार असणार आहे.

वरील सुचनांचे पालन करणे हे आपल्याला बंधनकारक राहिल आपलेकडून आदर्श आचारसंहिता भंग झाल्यास आपणास जबाबदार धरण्यात येऊन आपले विरूध्द कडक कायदेशिर कारवाई करण्यात येईल असे जनसंपर्क अधिकारी पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड यांनी आवाहन केले आहे.

# विजय रणखांब यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्काराबदल कलंबर शाखेतर्फे सत्कार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**



बहुजन शक्ती सेनेचे संस्थापक अध्यक्ष तथा लसाकमचे नांदेड जिल्हाध्यक्ष, शासनाचे व ईतर विवीध पुरस्कार प्राप्त, कामगार नेते विजय रणखांब यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे महावितरण कलंबर शाखा कर्मचारी बांधवांचे वतीने दि.२३/१०/२०२४ रोजी शाल पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. समाजकार्यात पूर्णवेळ देणारे तथा कामगार संघटना व विविध संघटनेमध्ये कार्य करणारे सामाजिक कार्यकर्ते रणखांब सर यांचे कार्य महान असून ते शोषित पीडित वंचितांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करतात. अशा महान कार्यासाठी त्यांना राज्य स्तरीय समाज भूषण पुरस्कार मिळाला असल्याचे मनोगत महावितरणचे दिनेश मेहर यांनी व्यक्त केले आहे.

कामगार नेते विजय रणखांब यांना शासनाचे व विविध सामाजिक पुरस्कार मिळालेले असून त्यांना हा राज्यस्तरीय समाज भूषण मिळालेला पुरस्कार हा सर्व कामगारांसाठी सर्वांसाठी न्याय देणारा असून त्यांच्या कामाची पोचपावती आहे असे मत महावितरणचे विलास टोकलवाड यांनी व्यक्त केले आहे. मला मिळालेल्या राज्य स्तरीय समाज भूषण पुरस्काराबद्दल आपण सत्कार केला त्याबद्दल आपले सर्वांचे खूप खूप मनापासून आभार श्री विजय रणखांब सर यांनी व्यक्त केले. यावेळी विलास टोकलवाड ,चंद्रकांत भालेराव, दिलीप मरर्डे अमोल बोधनकर, राजेश डांगे, बालाजी गीते इमरोज शेख, सलमान, साई गीते, नरेंद्र ताटे, लाला मामा व सर्व मित्र उपस्थित होते.

# माजी आ.भीमराव धोंडे यांनी केला उमेदवारी अर्ज दाखल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**



आष्टी-पाटोदा- शिरूर विधानसभा मतदारसंघातुन विधानसभा निवडणुकीसाठी मा. आ.भीमराव धोंडे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.कसलाही गाजावाजा न करता अगदी साध्या पद्धतीने मोजक्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन निवडणूक निर्णय अधिकारी वसिमा शेख व साहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती वैशाली पाटील यांच्याकडे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.याप्रसंगी युवा नेते अजयदादा धोंडे,माजी सभापती ड.साहेबराव म्हस्के, अभयराजे धोंडे,उपसभापती पांडुरंग नागरगोजे,दिलीपराव काळे,माजी शिक्षण सभापती नियामत बेग,जेष्ठ नेते विठ्ठलराव बनसोडे,माजी जि.प.सदस्य अशोक सवासे,माजी सभापती सौ.सुवर्णाताई लांबरुड,जेष्ठ नेते लालाभाऊ कुमकर,ड. अशरफ शेख,बाबुराव कदम,पाडुरंग गावडे,चेअरमन राजेश धोंडे,माजी जि.प.सदस्य रामराव खेडकर,माजी सरपंच बाळासाहेब पवार,ड. रत्नदिप निकाळजे,रिपाइंचे अध्यक्ष अशोक साळवे,शंकर देशमुख,बाबा ससाणे,संजय धायगुडे,चंद्रशेखर साके,सरपंच दादासाहेब जगताप,रघुनाथ शिंदे आदि मान्यवर उपस्थित होते.

# माजी आमदार राहुल जगताप यांनी अपक्ष उमेदवारी करावी अशी कार्यकर्त्यांची मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**



श्रीगोंदा मतदार संघात माजी आमदार राहुल जगताप यांनी अपक्ष उमेदवारी करावी अशी मागणी तालुक्यातील मतदार करत आहेत कारणं आघाडीच्या नेत्यांनी आयत्या वेळी आयाराम झालेल्या नागवडे यांना उमेदवारी दिल्यामुळे श्रीगोंदा तालुक्यातील निष्ठावंत कार्यकर्ते प्रचंड नाराज झाले आहेत एक तर राहुल जगताप यांनी अपक्ष उमेदवारी करावी अन्यथा मतदार राहुल जगताप यांच्या पासुन दुरावतिल अशी कार्यकर्त्यांची चर्चा रंगताना दिसत आहे जगताप यांना स्वताहाच अस्तित्व टिकवून ठेवायचं असेल तर अपक्ष उमेदवारी करावी लागणार आहे हे मात्र नक्की कार्यकर्त्यांच्या मागणीचा राहुल जगताप काय विचार करतात हे येत्या दोन दिवसांत समोर येणार आहे तोपर्यंत कार्यकर्ते मात्र नाराजीत राहणार आहेत मात्र राहुल जगताप यांना अपक्ष का होईना उमेदवारी करावी लागणार आहे कारणं कार्यकर्ते दुरावले तर हे जगताप यांना परवडणारे नाही कारण कार्यकर्ते एकदा दुरावले तर परत जुळवून घेणे अवघड आहे राहुल जगताप हेच जणतेच्या मणातले आमदार आहेत हे जगताप यांनी समजून घेणे आवश्यक आहे काही कार्यकर्ते उद्या गुरुवार दिनांक२४ रोजी राहुल जगताप यांच्या घरी जाऊन भेटुन अपक्ष लढण्याची मागणी करणार असल्याचे समजते .

# नांदेड जिल्हाचे भुमिपुत्र सुधाकर तेलंग झाले शिक्षण सहसंचालक

### लातूर विभागीय परीक्षा मंडळाचे पूर्णवेळ अध्यक्षपदाची जबाबदारी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**



नांदेड जिल्हाचे भुमिपुत्र लातूर विभागीय परीक्षा मंडळाचे सचिव तथा प्रभारी अध्यक्ष सुधाकर तेलंग यांची दोनच दिवसांपूर्वी शिक्षण सहसंचालक म्हणून पदोन्नती झाली आहे .त्यांच्यावर लातूर विभागीय परीक्षा मंडळाचे अध्यश्व म्हणून पूर्णवेळ (नियमित) जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यांच्या पदोन्नतीचे शैक्षणिक वर्तुळातून स्वागत होत आहे. सुधाकर तेलंग यांची २५ वर्षे सेवा झाली आहे, नदिड, सिंधुदुर्ग,मुखेड, लातूर, सांगली या. ठिकाणी त्यांनी सेवा केली. कमी कालावधीत त्यांना शासकीय सेवेतील मोठ्या जवाबदाऱ्या पेलण्याची संधी मिळाली आहे. लातूरसह छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर येथील विभागीय परीक्षा मंडळाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी अतिरिक्त जबाबदारी पार पाडली आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी तिन्ही परीक्षा मंडळांचा उत्तम कारभार पाहिला असून त्यांना लिखाण व वाचनाची तर आवड आहेच; पण प्रशासकीय कामातील व्यासंग आणि कसब त्यांच्याकडे आहे. त्यांच्या नव्याने झालेल्या शिक्षण सहसंचालक पदोन्नतीचे नांदेड जिल्हामध्ये सुधाकर तेलंग यांचे स्वागत करून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# तिकीट न मिळाल्याने भाजपच्या नाराज नेत्याने गाठली दिल्ली

लोकनेता न्यूज नेटवर्क । **मुंबई (वृत्तसंस्था)**

कोपरगाव विधानसभा मतदारसंघाची उमेदवारी न मिळाल्याने नाराज झालेल्या भाजपच्या माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांनी थेट केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन आपली नाराजी कळवली आहे.सत्ताधारी महायुतीच्या जागावाटपात कोपरगाव विधानसभा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसला सुटला आहे. पक्षाने येथून आशुतोष काळे यांना उमेदवारी दिली आहे. भाजपच्या माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांनी यावर तीव्र नाराजी व्यक्त केली होती. त्यांनी आपली नाराजी राज्यातील भाजपच्या नेतृत्वाला कळवली. त्या एवढ्यावरच थांबल्या नाहीत, त्यांनी मंगळवारी रात्री थेट केंद्रीय मंत्री तथा भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांची भेट घेऊन आपले म्हणणे मांडले.

# जिल्हाधिकारी किरण पाटील सिंदखेडराजा विधानसभा मतदार संघात केलेल्या उपाययोजनाचा आढावा घेण्यासाठी भेट

## ईव्हीएम स्ट्रॉंग रूम,मतमोजणी ठिकाणी व नामाक़न अर्ज कक्षाची केली पाहणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

मा. केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ करिता निवडणूक कार्यक्रम घोषित केलेला असून आज जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी तारीख २२ आक्टोबर रोजी २४सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघात निवडणुक निर्णय अधिकारी यांनी मतदार संघात केलेल्या उपाययोजनाचा संदर्भात आढावा भेट दिली असून त्यांनी ईव्हीएम स्ट्रॉग रूम, मतमोजणी ठिकाण , कर्मचाऱ्याचे प्रशिक्षण ठिकाण व नामाक़न अर्ज कक्षाची पाहणी केली असून मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत




जिल्हाधिकारी श्री.डॉ. किरण पाटील यांनी सिंदखेडराजा येथील तहसील कार्यालयामधील नामांकन अर्ज मिळणाऱ्या कक्षाला भेट देऊन पाहणी केली.

निवडणूक उमेदवारांचे अर्ज हे मा. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या तहसील कार्यालय येथील दालनामध्ये अर्ज स्वीकृती होणार आहे. अर्ज स्वीकृती साठी उमेदवारा सोबत फक्त ५ व्यक्तींनाच प्रवेश दिला जाणार आहे, आज दि. २२ ऑक्टोबर २०२४ रोजी २४,सिंदखेडराजा मतदारसंघांसाठी १९ व्यक्तींनी एकूण ३६ नामांकन अर्ज घेतले आहेत. यावेळी जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी मतदारसंघातील सर्व नोडल अधिकाऱ्यांची बैठक मा. जिल्हा निवडणूक अधिकारी श्री पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. बैठकीमध्ये सविस्तर अशी चर्चा करून मा. पाटील यांनी सर्व नोडल अधिकाऱ्यांना त्यांची कर्तव्य कशी पार पाडली पाहिजे याबद्दल मार्गदर्शन केले. प्रत्येक सेल च्या नोडल अधिकाऱ्यांना काही समस्या आहेत का हे जाणून घेतले तसेच असलेल्या समस्यांना कशा पद्धतीने सोडवले पाहिजे याबद्दल सांगितले.

ईव्हीएम, व्हीव्हीपॅट कार्यप्रणाली यांच्या बद्दल सविस्तर माहिती सांगण्यात आली, टपाली मतपत्रिका, इव्हीएम शी संबंधित बाबींची योग्य काळजी घेऊन त्यात कसलीही चूक होऊ नये याबद्दल सूचना देण्यात आल्या असून आजच्या या पाहणीवेळी मा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे,मा. उपविभागीय पोलीस अधिकारी मनीषा कदम, मा. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार सिंदखेडराजा श्री. अजित दिवटे, मा.

> **अर्ज भरण्याच्या पहिल्या दिवशी रामदास कहाळे यांच्या सह १९ लोकांनी ३६ नामांकन अर्जांची खरेदी केली मात्र एकाही उमेदवारानी अर्ज सादर केला नाही.**

सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार देऊळगाव राजा वैशाली डोंगरजाळ, मा. गट विकास अधिकारी देऊळगाव राजा श्री. मुकेश माहोर,मा. मुख्याधिकारी नगरपरिषद सिंदखेड राजा श्री. प्रशांत व्हटकर, मा.निवडणुक नायब तहसीलदार सिंदखेड राजा श्री. मनोज सातव, मा. निवडणूक नायब तहसीलदार श्री. प्रवीण घोटकर, मा. नायब तहसीलदार सिंदखेडराजा अस्मा मुजावर, मा. नायब तहसीलदार सिंदखेडराजा श्री. प्रवीणकुमार वराडे, मा. नायब तहसीलदार देऊळगाव राजा सायली जाधव,मा. नायब तहसीलदार देऊळगाव राजा प्रांजल पवार, मा. पोलीस निरीक्षक सिंदखेडराजा श्री. ब्रम्हदेव शेळके ,मा. नोडल अधिकारी प्रसारमाध्यम प्रतिनिधी प्रकाश शिंदे श्री. अंकुश म्हस्के, संजय सोनुने उपस्थित होते.


# अचली ग्रामपंचायत सरपंच सचिवाने मागासवर्गीय वस्तीतील तरुणांना व्यायाम शाळेपासून वंचित ठेवले

## गटविकास अधिकारी यांच्याकडे ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांची तक्रार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

सिदखेडराजा तालुक्यातील अंचली ग्रामपंचायतचे सरपंच व सचिव यांनी संगणमत करून दलित वस्ती मधील व्यायाम शाळेचे पाच लाख रुपये काढून त्यामध्ये फक्त बेसमेंट केले त्यामुळे मागासवर्गीय वस्तीतील तरुणांना व्यायाम शाळेपासून वंचित ठेवले असल्याची तक्रार ग्रामपंचायत सदस्य प्रकास लिहिणार यांच्या सह इतर ग्रामपंचायत सदस्य व गावकरी यांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे तक्रार केली आहे याबाबतीत सविस्तर असे की




जिल्हा क्रीडा संचालनालय यांच्या माध्यमातून ग्रामपंचायत अंतर्गत मागास प्रवर्गातील तरुणाना गावातच व्यायाम करण्यासाठी व्यायाम शाळा असविव्या हेतूने ७ लक्ष रू व्यायाम शाळा अनुदान दिल्या जाते यामधे अंचली ग्रामपंचायत ला ७ लक्ष रू प्राप्त झाले होते या मधे ग्रामपंचायत चे सरपंच व सचिव यांनी गावामधे व्यायाम शाळेचे फक्त बेसमेट केले आणि ५ लक्ष रू काढून घेतले मात्र अजूनही व्यायाम शाळा चे पुढील कामकाज करण्यात आले त्यामुळे ग्रामपंचायत चे सदस्य प्रकास लिहिणार यांच्या सह इतर ग्रामपंचायत सदस्य गावकरी यांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे दिनांक १३/९/२०२४ रोजी निवेदन देवून त्वरित चौकशी होवून कारवाई करण्याची मागणी केली होती परंतु पंचायत समिती प्रशासन यांनी आजपर्यंत कुठलीच कार्यवाही करण्यात आली नाही त्यामुळे संबधित दोषी वर कारवाई होवून मागास प्रवर्गातील वस्तीत त्वरित व्यायाम शाळेचे बांधकाम करण्यात येवून मागास प्रवर्गातील तरुणांसाठी व्यायामा ची सोय उपलब्ध होईल यांची दक्षता घ्यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

# जिल्ह्यात पहिल्याच दिवशी ३६९ उमेदवारी अर्जांची विक्री

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

विधानसभेचा रणसंग्राम सुरू झाला असून आजपासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे.विधानसभा निवडणुकांच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणूक पार पडणार असून २३ नोव्हेंबरला निवडणुकांचे निकाल लागणार आहेत. विधानसभा निवडणुकीसाठी सर्व राजकीय पक्ष जोरदार तयारीला लागले आहेत.



याच पार्श्वभूमीवर अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख २९ ऑक्टोबर असून २६ आणि २७ ऑक्टोबरला शासकीय सुट्टी असल्याने अर्ज दाखल करण्यासाठी उमेदवारांना अवघे ६ दिवस मिळणार असल्याची माहिती मिळत आहे.

राज्याच्या विधानसभा निवडणुकीचा बिगूल वाजला आहे. निवडणूक कार्यक्रमानुसार आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा पहिला दिवस होता. पहिल्याच दिवशी अहिल्यानगर जिल्ह्यातील १२ विधानसभा मतदारसंघांसाठी १९२ व्यक्तींनी ३६९ उमेदवारी अर्ज नेले. तर प्रशासनाकडे चार उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

जिल्ह्यात आज सर्वाधिक उमेदवारी अर्ज शेवगाव-पाथर्डी मतदारसंघातून नेण्यात आले. शेवगाव पाथर्डीतून तीन तर कर्जत-जामखेड मतदारसंघातून एक उमेदवारी अर्ज प्रशासनाकडे दाखल झाला आहे. नगर शहरातून १४ व्यक्तींनी ३० उमेदवारी अर्ज नेले आहेत. यात आमदार संग्राम जगताप यांच्यासाठी अनुप काळे यांनी दोन उमेदवारी अर्ज नेले आहेत.

# डॉ.सौ.प्रतिभा पाचपुते महायुतीच्या उमेदवार तर आघाडीच्या अनुराधा नागवडे फायनल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

श्रीगोंदा - श्रीगोंदा नगर विधानसभा मतदार संघामधुन आगामी निवडणुकीसाठी डॉ. सौ. प्रतिभाताई बबनराव पाचपुते यांना महायुतीची अधिकृत उमेदवारी जाहीर झाली आहे.भारतीय जनता पार्टी च्या पक्ष कार्यालय कडून उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली.या पहिल्याच यादी मधे सौ. पाचपुते यांचे नाव आल्याने मतदार संघातील महायुतीच्या समर्थक कार्यकर्त्या मधे आनंदाचे व उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.यावेळी कार्यकर्त्यांनी ठिक ठिकाणी फटाक्याची आतिषबाजी करत जल्लोष साजरा केला.







प्रतिभा ताई पाचपुते या श्रीगोंदा मतदार संघाचे विद्यमान आमदार बबनराव पाचपुते यांच्या पत्नी आहेत.तसेच अहमदनगर जिल्हा परिषद सदस्य म्हणून देखील त्यांनी यशस्वी व सक्षमपणे काम पाहिले आहे. त्याचप्रमाणे त्यांनी तालुक्यामध्ये महिला बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे अनेक प्रश्न मार्गी लावले असुन महिलांचे मोठे संघटन तयार केले आहे. तसेच आमदार बबनराव पाचपुते यांनी तालुक्यामध्ये रस्ते पाणी वीज बंधारे सभामंडप या सह केलेल्या विविध विकास कामांचा फायदा डॉ प्रतिभा पाचपुते त्यांना निश्चितपणे होऊ शकतो. असा विश्वास मतदार संघातील नागरिक व्यक्त करत आहेत.तर दुसरी कडे महाविकास आघाडी चा श्रीगोंदा तालुक्यातील विधानसभेचा उमेदवार टोकाच्या संघर्षीनंतर अनुराधा नागवडे यांना शिवसेना ठाकरे गटाची उमेदवारी जाहीर झाली आहे आयत्या वेळी आयाराम झालेल्या नागवडे यांना उमेदवारी दिल्यामुळे आघाडीतील शरद पवार गटाचे उमेदवारी चे प्रबळ दावेदार राहुल जगताप नाराज असल्याचे खात्रीलायक वृत्त मिळाले आहे त्यामुळे उमेदवारी मिळवून सुद्धा अनुराधा नागवडे यांना वाटतं तेवढं सोपं नाही कारण राहुल जगताप काय भूमिका घेतात हे महत्वाचे ठरणार आहे जर जगताप यांनी अपक्ष उमेदवारी केली तर नागवडे यांना मोठी डोकेदुखी होणार आहे कारणं राहुल जगतापच किंग मेकर आहेत सेवटी जगताप काय भूमिका घेतात याकडे संपूर्ण मतदारसंघांचे लक्ष लागले आहे .

# वझरे गावच्या सरपंचपदी शिवसेनेच्या सौ. बानू चव्हाण तर उपसरपंचपदी लक्ष्मण वाघमारे यांची बिनविरोध निवड

## आ.शहाजीबापू पाटील यांच्या हस्ते सत्कार संपन्न



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सांगोला । प्रतिनिधी**

सांगोला तालुक्यातील वझरे गावच्या सरपंचपदी आमदार शहाजीबापू पाटील यांच्या गटाच्या शिवसेनेच्या सौ. बानू मल्हारी चव्हाण यांची सरपंचपदी तर लक्ष्मण गोविंद वाघमारे यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड झाली . त्याबद्दल आमदार शहाजीबापू पाटील यांच्या हस्ते संपर्क कार्यालयामध्ये नूतन सरपंच ,उपसरपंचांचा सत्कार करून भावी राजकीय वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी विधानसभा प्रमुख प्रा. संजय देशमुख, शिवसेनेचे शिवाजी घेरडे, शिवसेनेचे नेते दादासाहेब वाघमोडे सर, उत्तम सरगर सर, तसेच वझरे गावचे माजी उपसरपंच बाबुराव जाधव, माजी सरपंच भिकू वाघमारे, सचिन यादव, विजय कोटे, आप्पा चव्हाण, उमाजी चव्हाण, स्वप्निल रेड्डी, वसंत रामचंद्र पाटील, राजू पाटील, मल्हारी चव्हाण, शिवाजी चव्हाण ,विलास चव्हाण, दत्तात्रय शिवाप्पा पाटील ,भारत रेड्डी ,बलभीम चव्हाण, लक्ष्मण मंडले, मोहन चव्हाण, समाधान यादवशेठ, श्रीधर यादव, पिंटू यादव ,रमेश यादव आदी मान्यवर उपस्थित होते.


आमदार शहाजीबापू पाटील यांच्या शिवसेना गटाच्या वझरे गावच्या सरपंचपदी बानू चव्हाण तर उपसरपंचपदी लक्ष्मण वाघमारे यांची निवड झाल्याबद्दल आमदार शहाजीबापू पाटील यांच्या हस्ते सत्कार करून त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी मान्यवरांकडून सरपंच, उपसरपंच यांचे अभिनंदन करण्यात आले.

# एकलारा ते बोरगाव रस्त्यांची दुरावस्था

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । शिवकुमार बिरादार**

मुखेड तालुका व देगलूर तालुक्याशी जोडणारा एकलारा हिब्बट बोरगाव हा मुख्य रस्ता खराब झाला आहे.जनतेला अजूनही चांगला व पक्का रस्ता मिळत नसल्याने जनतेत रस्त्याबाबत तिव्र नाराजी दिसत आहे.मुखेड तालुका हा रस्त्याबाबत नेहमीच जिल्हाभरात चर्चेचा विषय असतो.येथील रस्त्यावर पडलेले मोठे मोठे खड्डे हा येथील प्रवाशांची नेहमीचीच डोकेदुखी ठरलेली आहे.तालुक्याला जाण्यासाठी मुख्य रस्ता असलेला आणि अंतर कमी असलेला म्हणून या रस्त्याची ओळख आहे.यामध्ये इंधनाची बचत होते म्हणून या रस्त्याला पसंती आहे.त्यातल्या त्यात अंतर पण कमी आहे.मुखेड व देगलूर या तालुक्याला जोडणारा मुख्य रस्ता असुन,खानापूर पासुन एकलारा मार्ग धनज,नंदगाव,हिब्बट,मंडलापूर,बोरगाव,केरूर ते मुखेड यासह अन्य रस्त्यावरुन प्रवास करणे अवघड झाले आहे.



हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirkala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904